नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 09/01/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## खून

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 07 कि. मी अंतरावर मौजा पठार शिवार काटोल येथे दिनांक 11/12/2020 चे 14.30 वा. ते 17.00 वा. दरम्यान वय 17 वर्ष विधीसंघर्षीत बालिका व मृतक नामे– संकेत मधुकर तायडे, वय 18 वर्ष, रा. सुशीलापुरम काटोल हे मौजा पठार शिवार येथील जंगलात गेले होते. विधीसंघर्षीत बालिका व मृतक यांचा झगडा झाला असता विधीसंघर्षीत बालिका हिने त्याच्या डोक्यावर दगड मारून जिवानीशी ठार मारले. मर्ग क्र. 80/2020 कलम 174 जाफौ चे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्री मधुकर गेंदबाजी सुशीलापुरम सावरगाव रोड, काटोल, वय 17 वर्ष, रा. मरामायनगर काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. महादेव आचरेकर 8380072211 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 19 किमी अंतरावर गोसेवाडी शिवार येथे दिनांक 08/01/2021 चे 00.30 वा. दरम्यान एमच–40/एन–7577 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी क्र– 1) दिपक पुरूषोत्तम चंचवटे, वय 35 वर्ष याने टिप्पर मालक आरोपी क्र. 2) पवन धनकर, दोन्ही रा. महादुला पो. स्टे. कोराडी याच्या सांगण्यावरून व संगनमताने गोसेवाडी शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 6,000/– रू. रेती भरून घेवुन जातांना वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 12,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई विवेक राठोड पो.स्टे. खापा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. मानकर 9422942764 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 02 कि.मी. मौजा कुही येथे दिनांक 08/01/2021 चे 07:00 वा. ते 07.30 वा. दरम्यान एमएच–40/सिबी– 4188 चा चालक आरोपी नामे– राकेश वामन बावनकुळे, वय 30 वर्ष, रा. आंबाडी याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचे वाहनावरील संतुलन बिघडुन तो कुही कडुन आंबाडी कडे येत असतांना हनुमान मंदिराजवळ असलेल्या नाल्यात जाउन पडल्याने तो स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद अरविंद सोनेकर, वय 28 वर्ष, रा. आंबाडी ता. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि श्री तकित 8766934595 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर